# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०२/२०२५ (बुधवार) संध्याकाळ**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक २५/०२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पोलीस स्टेशन मौदा हद्‌दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. पोलीसांनी मिळालेल्या माहीतच्या आधारे हल्दीराम फॅक्ट्रीजवळ नाकाबंदी केली असता एक **१२ चक्का वाहन क्र. एम.एच ४० सी.व्ही ५०५५** रेती वाहतुक करीतांना मिळुन आले. वाहनाला थांबवुन चालक नामे समिर रमजान खान वय २२ वर्षे ,रा. सरफराज खान यांचे घरी, बाबा फरीद नगर, जामा मस्जीद जवळ, खरबी नागपुर याला परवान्याबाबत विचारले असता त्याच्या जवळ कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ११ ब्रास रेती किंमती ५५,०००/रूपये आणि २) **१२ चक्का वाहन क्र. एम. एच ४० सी.व्ही ५०५५** किंमती **५५,००,०००**/—रूपये असा एकुण ५५,५५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

**आरोपी चालक समिर रमजान खान वय २२ रा. सरफराज खान यांचे घरी बाबा फरीद नगर जामा मस्जीद जवळ खरबी नागपुर आणि १२ चक्का वाहन क्र. एम.एच ४० सी.व्ही ५०५५ चा मालक** यांच्या विरूध्द कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज म संहीता सहकलम ४,२१ खान खनिज सहकलम कलम ३ सा.सं.नु.अधि. सह.क. ५०,१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. **आरोपी चालकाला अटक करण्यात आली आहे.**




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर